# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली- ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)

फोन नं.(०२३५८) कार्यालय :-२८२४११ ते २८२४१३

Web site : www.dbskkv.org

फॅक्स :- २८३०६५


जा.क्र. बासाकोकृवि/आस्था/अ-७/१००४/२०२२, दिनांक : 22 SEP 2022

**वाचा :** शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

## परिपत्रक

शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये 'मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावीत' असे निर्देशित केले आहे. त्यानुसार कृषि, कृषि अभियांत्रिकी आणि मत्स्य विद्याशाखेतील सहयोगी प्राध्यापक संवर्गातील पदोन्नती कोटयातील पदे भरण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालये, संशोधन केंद्रे, कृषि तंत्रविद्यालये आणि योजनांमधील नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, सहयोगी प्राध्यापक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरावयाची असून त्याचा तपशिल सोबत जोडला आहे.

आपल्या अधिपत्याखालील कार्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून Maharashtra Agricultural Universities (Krishi Vidyapeeths) (First Amendement) Statutes, 2014 अन्वये, 'सहयोगी प्राध्यापक' पदासाठी परिशिष्ट-अ अन्वये, विहित केलेल्या प्रपत्रात अर्ज प्राप्त करुन या कार्यालयास दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ पूर्वी न चुकता पाठवावेत तसेच अर्जासोबत सादर करावयाची विहित प्रपत्रातील माहितीची सॉफ्ट कॉपी (MS Office Word मध्ये) kkvest1@gmail.com या ई-मेल वर पाठविण्यात यावी.

प्रस्तुत परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून परिपत्रकावर संबंधितांची पोहोच घ्यावी. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले पदोन्नती प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत. पदोन्नती संदर्भात मागाहून तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी नियंत्रण अधिकारी यांची राहिल. सदर परिपत्रक अर्जाच्या विहीत नमुन्यासह www.dbskkv.org या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(भरत सोळंकी)
**कुलसचिव**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी सादर -

१. शिक्षण संचालक / संशोधन संचालक / संचालक विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली /मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी /कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यायल, दापोली /वनशास्त्र महाविद्यालय, दापोली /काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, रोहा /उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे /उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली /निम्नस्तर शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३. प्राचार्य, मत्स्य पदविका अभ्यासक्रम, शिरगांव, रत्नागिरी
४. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला / प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत
५. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
६. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, पेठकिल्ला, रत्नागिरी
७. कृषिविद्यावेत्ता, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाट्ये, रत्नागिरी / कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट
८. कनिष्ठ उद्यानविद्यावेत्ता, आंबा संशोधन उपकेंद्र, गिर्ये, रामेश्वर, ता. देवगड
९. प्राचार्य, कृषि तंत्रविद्यालय, लांजा / कृषि तंत्रविद्यालय, रोहा
१०. अधीक्षक, पशुधन संशोधन केंद्र, निळेली
११. संचालक, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा (पूर्व), मुंबई
१२. खार जमीन शास्त्रज्ञ, खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल
१३. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, आवाशी / कृषि संशोधन केंद्र, शिरगाव / कृषि संशोधन केंद्र, पालघर / कृषि संशोधन केंद्र, रेपोली / सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन
१४. कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
१५. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

२/- यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक सोबतच्या सहपत्रांसह विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

## सहयोगी प्राध्यापक संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | विभाग | पदोन्नतीसाठी उपलब्ध पदे |
|---|---|---|
| **अ) सहयोगी प्राध्यापक कृषि विद्याशाखा** | | |
| १ | कृषिविद्या | २ |
| २ | उद्यानविद्या | १ |
| ३ | पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र | २ |
| ४ | वनस्पती रोगशास्त्र | १ |
| ५ | कृषि विस्तार | १ |
| ६ | कृषि रसायन व मृदशास्त्र | १ |
| ७ | पीएचएम - फळे, भाजीपाला आणि फुले | १ |
| | **एकूण अ** | **९** |
| **ब) सहयोगी प्राध्यापक, कृषि अभियांत्रिकी** | | |
| १ | इरिगेशन ॲन्ड ड्रेनेज | १ |
| ३ | इलेक्ट्रीक ॲन्ड अदर एनर्जी सोर्सेस | १ |
| | **एकूण ब** | **२** |
| **क) मत्स्य विद्याशाखा** | | |
| १ | मत्स्य अभियांत्रिकी | १ |
| | **एकूण क** | **१** |
| | **एकूण अ+ब+क** | **१२** |

# <u>Annexure - A</u>

## Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli, Dist. Ratnagiri

### Statement showing the details of candidates considered for promotion for the post of Associate Professor ..............................

| | | |
|---|---|---|
| ➢ **Required qualification for the post of Associate Professor** | : | (1) A Ph.D. in respective discipline;<br>(2) A minimum eight years of experience in teaching or research or extension education in the position of Assistant Professor or its equivalent; in a University or Accredited grant-in- aid College, Recognized Research Institution Excluding the period of Ph.D.;<br>(3) Contribution to educational innovation, design of new curricula and courses and technology mediated teaching-learning process with evidence of having guided two post graduate students worked on advisory committee of five post graduate students in the discipline where masters programme is not available; Or<br>Developed at least two varieties of crops or breeds and received recommendations of the Joint Agricultural Research Council of the State Agricultural Universities or recommendation of Central Variety Release committee therefore, Or<br>Having the proof of transfer of two or more technologies or varieties, and duly certified by Director of Extension Education.<br>(4) Evidence of at least five published papers in recognized journals having National Academy of Agricultural Science rating;<br>(5) A minimum score as stipulated in the Academic Performance Indicator (API) based on Performance Based Appraisal System (PBAS). |
| ➢ **Eligibility Criteria (MAU Statute No. 52(3)(A)(iii))** | : | a) Average gradation of Annual Confidential Reports for preceding five years, as per Government Resolution coming in force, from time to time.<br>b) Eligibility for promotion shall be considered according to the minimum score of API from category I, II and III based on norms depicted in Table 1,2, and 3 of Appendix – II of the Statute and as per minimum qualifications, service experience as depicted in Statute 41 and 73. |
| ➢ **Evaluation Criteria** | : | Evaluation criteria for promotion of Academic Staff shall be as per minimum qualification, minimum service experience as per Statute 41 and 73 and API score as per Tables 1,2 & 3 of Appendix – II of the Statute. |

| Sr. No. | Name of the candidate | Sr. No. as per Seniority | Cate-gory | Qualifica-tion | Service details showing minimum eligibility | Experience of guiding at least two post graduate students (proof attached) | Contribution to educational innovation, design of new curricula and courses and technology mediated teaching-learning process; | Five published papers in recognized journals having NAAS rating. (full papers be attached) | A minimum score as stipulated in the API (Please attached score cards for the period of 2017-18 to 2021-22) | | | | | | Average grading of CR | | | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | 2017-2018 | 2018-2019 | 2019-2020 | 2020-2021 | 2021-2022 | Rank | 2017-2018 | 2018-2019 | 2019-2020 | 2020-2021 | 2021-2022 | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**Name and Signature**